■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २६६ ■ शनिवार दि.१४ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 266 ■ Saturday Dt.14 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# शेर की झलक सबसे अलग डीएम कमबॅक.. चक्रव्यूहात अडकलेले मुंडे इनअ‍ॅक्शन मोडवर..!

## स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या सदरेवर लोकनेत्यांचा वारसा जोपासणारा डीएम परत लोकसेवेत!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# बीडच्या राजकारणाच्या दृष्टीने पुन्हा जनसागरात मुंडे पॅटर्न चालणार!

## धनंजय मुंडेंची एन्ट्री होताच अनेक दिग्गज नेते भेटीला धावले; विरोध करणाऱ्यांनीही भेटी घेतल्या?

■ काल झालेल्या धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्हा दौऱ्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या?

■ पहिल्याच धडाकेबाज कामगिरीने प्रभू वैद्यनाथाच्या भूमीत विकास कामांना गती

■ तेच कार्य तीच उम्मीद आणि ऊर्जा देणारं व्यक्तिमत्व धनंजय मुंडे मैदानात

■ लोकांच्या सुखादु:खामध्ये भेटी न घेतल्यामुळे अनेकांच्या घरी जाऊन दिल्या भेटी

■ गेल्या सहा महिन्यात विकासाला ब्रेक, पण आता विकास कामांना गती येणार

■ बीडच्या राजकारणात सक्रिय होत अचानक दौऱ्याने विरोधकांनी तोंडात बोट घातले

■ अजित पवारांची बीड जिल्ह्यात ताकद वाढविण्यासाठी धनंजय मैदानात

■ स्थानिक स्वराज्य निवडणुकीमध्ये धनंजय मुंडेची जादुची कांडी चालणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून जातीचा जास्त प्रमाणात पेरलं गेलं या जातीच्या विषयाने धनंजय मुंडे यांच्या विरोधात वातावरण तयार करण्यात आलं. हे राजकीय शेडयंत्र होतं का? अशी आता बीडची जनता मनू लागली आहे. धनंजय मुंडे यांनी काल बीड शहरांमध्ये एन्ट्री करून काल राष्ट्रवादी भवन या ठिकाणी कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. इच्छा असून सुद्धा गेल्या तीन ते चार महिन्यापासून अनेकांच्या सुखदु:खामध्ये सहभागी होत आले नाही. त्यामुळे काल धनंजय मुंडे यांनी अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या याचवेळी मात्र धनंजय मुंडे ने विकास सावली भर दिली आहे. धनंजय मुंडे यांचे एन्ट्रीने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे शेर की झलक सबसे अलग अशी चर्चा आता बीड शहरांमध्ये होत आहे.

धनंजय मुंडे हे राष्ट्रवादीचे दिग्गज नेते आहेत. धनंजय मुंडे यांच्या कमबॅकने आता बीड जिल्ह्यातील अनेकांचे धाबे दणाणले आहेत तर मराठा समाजातील दिग्गड नेते ज्यांनी विरोध केला होता. अशीही नेते धनंजय मुंडेंना का भेटले असा प्रश्न आता नागरिकांना होत आहे. धनंजय मुंडे यांच्या वरती शिंतोडे उडवायचे आणि पुन्हा त्यांचे जाऊन पाय धरायचे ही बाब काही बीड जिल्ह्यातील मोजक्या नेत्यांना चांगलीच महागात पडणार आहे. जनता आता त्यांना चांगला धडा शिकवणार आहे धनंजय मुंडे तीच ताकद आणि तीच ऊर्जा घेऊन पुन्हा मैदानात कमबॅक केल्यामुळे अनेकांच्या भावबाया उंचावल्या आहेत.

संघर्षील नेता माजी मंत्री धनंजय मुंडे यांना संकटं आणि आव्हाने कमी नाहीत. याच भटीत तावून सुलाखून निघालेले हे बीड जिल्ह्यातील नेतृत्व आपल्या काम आणि जनतेच्या हितासाठी आक्रमक भूमिका घेणारा नेता म्हणून राज्यात ओळख निर्माण केली. याच कामांच्या आणि सामान्य जनतेच्या बळावर निवडणुकीत तब्बल दिड लाखांचे मताधिक्याने विजय प्राप्त केला. पण न जाणे या नेत्यावर संकटे इतकी मेहरबान का आहेत ? याचे कारण त्यांचा संयम आणि संकटांशी दोन हात करण्याची तयारी हेच असावं का? आधीच शरीराची विविध व्याधी यामुळे प्रवासात असताना आगोदर औषध गोळ्यांचा गठोडा सोबत घेऊन फिरणारा हा नेता पण न थकता, न हरता राज्यभर शोषित, पीडितांचे अश्रू पुसण्यासाठी फिरणारा हे नेतृत्व आहे. पण मागील काही दिवसांपासून या नेत्यावर न केलेल्या पापाची मोठी शिक्षा भोगावी लागली असून, केवळ जवळचा कार्यकर्ता म्हणून अनेक आरोप करण्यात आले. पण डोंगरा सारख शांत राहून या नेत्याने सहन केले. यानंतर शारीरिक व्याधी सुरू झाली आणि बेल्स पाल्सी या आजाराने गाठले, यामुळे सलग दोन मिनिटे बोलता येत नव्हते, त्या आधीच डोळ्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली. अनेक लांछन लावण्यात आली. मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला पण संयम सुटला नाही. यासाठी तेवढी परिपक्वता आवश्यक असून, ही परिपक्वता व कणखरपणा संघर्षातून मिळाला आहे. इतकं सर्व होत असताना हा संयमाचा बादशाह धनंजय.

धन्यवाद मुंडे (डी.एम.) पुन्हा जनतेसाठी मैदानात उतरले आहेत. यापूर्वीही त्यांनी अनेक ठिकाणी गाठीभेटी देत लोकांचे प्रश्न ऐकून घेतले आहेत. यानंतर परळीत ही त्यांनी जनता दरबार घेऊन मी आणखी सामान्य माणसाच्या पाठीशी आहे असा संदेश दिला. परळी पाठोपाठ आता त्यांनी पूर्ण जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले असून, त्यांनी घेतलेल्या जनसेवेचा वसा आणि वारसा पुढे चालवत मागील सर्व काही विसरुन आणि सर्व गोष्टी पाठी मागे टाकून जनतेसाठी कामाला लागले.



## केज पोलिसांनी तीन सराईत चोरांच्या आवळल्या मुसक्या

केज । प्रतिनिधी



केज येथील बस स्टँड वारंवार होणाऱ्या चोऱ्या रोखण्यात पोलिसांना यश मिळाले असून पोलिसांनी तिघांची टोळी ताब्यात घेतली आहे. या पकडलेल्या आरोपी पैकी एकावर खुनाचा गुन्ह्यात त्याला न्यायालयाने जन्मठेपेची असून तो गेल्यावर कारागृहातून पॅरोलवर सुट्टीवर आल्या पासून पुन्हा कारागृहात गेलेला नव्हता. तो फरार होता. तर दुसरा आरोपी हा त्याच्यावर राज्यात वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात चोरीचे आणि इतर एकूण १६ गुन्हे दाखल आहेत. तर तिसरा मात्र केज बस स्थानकात हमाली करणारा हमाल असून तो त्यांना प्रवाशांची माहिती देत होता.

दि. ११ जून रोजी सकाळी ११:०० वा. चे सुमारास अमरजीत विजयकुमार धपाटे ही त्यांचे कॉफी शॉपचे कॉफी मटेरीअलचे पार्सल आणण्यासाठी बसस्थानक केज येथे गेले होते. ते बसची वाट पाहत थांबलो असता तेथे दोन अनोळखी ईसम माझ्या जवळ आले व त्यांनी तुमच्याकडे माझे काम आहे असे म्हणाले आणि त्यांना बसस्थानाकाचे बाजुला कोप-यात घेवुन

पान २ वर

## जिल्हाभरातील सेतू केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी

पात्रुड । प्रतिनिधी

मॉन्सूनची चाहूल लागली असून जिल्ह्यातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीत लागले आहेत. खरीप पेरणीपूर्व कामे आटोपण्याच्या लगबग सुरू असताना फार्मर आयडीसाठीही शेतकऱ्यांची धडपड सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक सरकारी योजना, जसे की, पीकविमा आणि नुकसानभरपाई फार्मर आयडीशिवाय मिळत नाहीत. केंद्र सरकारने फार्मर आयडी अनिवार्य केल्याने जिल्हाभरातील सेतू केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी उसळलेली दिसून येत आहे.केंद्र आणि राज्य सरकारच्या कृषिविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अ‍ॅग्रीस्टॅकमध्ये नोंदणी करीत फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आली आहे. अ‍ॅग्रीस्टॅकमध्ये नोंदणी केल्यास शेतकऱ्यांना डिजीटल ओळख मिळणार आहे. याद्वारे शेतकऱ्यांकडील जमीनधारणा, ते घेत असलेले पीक, कोणत्या क्षेत्रात सिंचन व्यवस्था आहे, कोणत्या योजनांचा लाभ घेत आहेत किंवा घेतला याची अचूक माहिती शासनाला मिळणार आहे. याच फार्मर आयडीच्या आधारे शेतकऱ्यांना वेळीचअनुदान व मदत देणेदेखील शक्य होईल. खरीप हंगामातील कृषी योजना, पीएम किसान

पान २ वर

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जण जागीच ठार

धारूर । प्रतिनिधी

भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका व्यक्तीस जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकजण जागीच ठार झाल्याची दुर्घटना शुक्रवारी सायंकाळच्या वेळी घडली. दरम्यान घटनेची माहिती समजताच दिंद्रुड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, केज येथील शेख आसरफ बाबा मियाँ हे शुक्रवार दि. १३ जुन रोजी सायंकाळी सहा ते साडे सहा वाजे दरम्यान भोगलवाडी फाटा येथील बस स्टॉपवर थांबले होते.

यावेळी धारूरकडुन भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने शेख आसरफ बाबा मियों यांना जोराची धडक दिली. यात शेख आसरफ हे धडक बसताच जागीच ठार झाले. धडक दिलेले वाहन कांही क्षणातच घटनास्थळारून पसार झाले. यावेळी भोगलवाडी फाट्यावर असलेल्या लोकांनी अपघात जागेवर जाऊन त्या व्यक्तीस तात्काळ उचलत दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते जागीच ठार झाले होते.

प्रथम त्याची ओळख पटत नव्हती. मात्र त्यांच्या जवळील आधारकार्डवरून त्यांची ओळख पटुन त्यांचे नाव शेख आसरफ बाबा मियाँ रा. टिपु सुलतान चौक केज असे असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेची माहिती समजताच दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे व त्यांचे सहकारी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन, त्यांची घटनास्थळाची व घटनेची पाहणी करून प्रेत शवविच्छेदनासाठी धारूर ग्रामीण रूग्णालयात पाठवले.

## संपादक शेख कामरान यांना निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जाहीर

### रविवारी होणार पुरस्काराचे वितरण

बीड । प्रतिनिधी



पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी आणि निर्भीड पत्रकारितेची दखल घेऊन व्यक्तिमत्वाला साजेल असा निर्भीड पत्रकारिता पुरस्कार घोषित करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि.१५) दुपारी ३ वाजता एका शानदार कार्यक्रमात सर सय्यद स्कूल जम जम कॉलनी येथे वितरण करण्यात येणार आहे.

शहरातील सामाजिक उपक्रमात अग्रस्थानी असलेल्या अल-खैर मल्टीपर्पज फाऊंडेशन, बीड कडून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. यासाठी अनेक उल्लेखनीय काम करणाऱ्यांना विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये दैनिक किसानची मागील चार वर्षांची वाटचाल आणि जपलेला निर्भीडपणा, तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नावर लेखणी झिजवणारे संपादक शेख कामरान राजू यांना निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार त्यांना साजेल असा असून, चार वर्षात सामान्यांसाठी किसानने कधीच तडजोड केली नाही. या पुरस्काराचे वितरण रविवारी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आणि गौरव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी नागरीक, पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अल-खैरचे फाउंडेशनचे इनामदार अझरुद्दीन मुजीब, मोमीन रजियोद्दिन सलीमोद्दिन, अमिरखान अय्युबखान यांनी केले आहे.

## बीड शहरचे पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

### उल्लेखनीय कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक यांचे प्रमाणपत्र

बीड । प्रतिनिधी

शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कौतुकाची थाप मारुन त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला आहे. बीड शहर पोलीस ठाणे हद्दीत अनेक कारवाया करुन चांगल्या प्रकारे अवैध धंद्यांना आळा बसलेला असून, तसेच गुन्हेगारां मध्ये कारवायांच्या माध्यमातून खाकीचा धाक - निर्माण केला आहे. नुकताच भरदिवसा घरफोडीची घटना घडली. होती. त्या घटनेचा अवघ्या ४८ तासांत तपास लावून चोरी गेलेला साडेदहा

पान २ वर



## संपादक शेख मुजीब यांना पत्रकारितेचा मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा पहिला पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी



पत्रकारितेच्या माध्यमातून गेली १२ वर्ष म्हणजेच तब्बल एक तप सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर बेधडक लेखनी चालवणार्या आणि वंचित, उपेक्षित घटकांना सातत्याने न्याय देण्याची भुमिका ठेवणार्या सायं.दै.बीड सिटीझनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सायं.दै.सिटीझनचे संपादक शेख मुजीब शेख खाजा यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकारितेतील पहिला दर्पणकार मराठवाडा भुषण २०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे. रविवार दि.१५ जुन रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई मराठवाडा विभागाच्या वतीने पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भुषण पुरस्कार सोहळा २०२५ चे आयोजन रविवार दि.१५ जुन रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदीर उस्मानपुरा येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून

पान २ वर

## अद्याप ३० लाखांहून अधिक बाकी

# माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने भरले ४२ लाख

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत २०१९ ते २०२१ या कालावधीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून वसुली करण्यात यावी, अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते अजय राऊत यांनी पणन संचालक, पुणे यांच्याकडे केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी सहाय्यक निबंधक अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले होते. चौकशीत गैरकायदेशीर डव्हान्स वाटपाचे प्रकार उघडकीस आले असून, त्याअनुषंगाने बाजार समितीकडून ४२ लाख १७ हजार ६८० रुपये रक्कम भरली गेली आहे.



चौकशी अहवालात बाजार समितीतील संचालक, कर्मचारी व अन्य संबंधित दोषी आढळल्यामुळे एकूण वसुलीयोग्य रक्कम ७३ लाख १४ हजार ९२२ रुपये निश्चित करण्यात आली होती. यावर आधारित आदेश ९ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा उपनिबंधकांनी दिला. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री विकास व विनियमन अधिनियम १९६३ च्या कलम ५७ अंतर्गत सहाय्यक निबंधक अधिकाऱ्यांची एक सदस्यीय न्यायाधिकाऱ्याप्रमाणे नियुक्ती करून सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत दोषी ठरवले गेलेले संचालक, कर्मचारी व इतरांनी आतापर्यंत ४२ लाख १७ हजार ६८० रुपये रक्कम भरली असली तरी, अद्याप ३० लाख ९७ हजार ४४२ रुपयांची रक्कम भरायची बाकी आहे. सहाय्यक निबंधकांनी आपल्या अहवालात बाजार समि तीने दिलेले डव्हान्स बेकायदेशीर ठरवले असून, बाजार समिती गंभीर दोषी असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणात सचिव व संचालकांवर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यासंदर्भात कोणतीही कारवाई न झाल्यास आपण न्यायालयात जाणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अजय राऊत यांनी दिला आहे.

## पप्पू मुजमुले यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर 'बेस्ट रिसर्च स्कॉलर' पुरस्कार

वडवणी । प्रतिनिधी

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील पी.एचडी. संशोधक श्री. पप्पू मुजमुले यांना जयपूर येथे झालेल्या १० व्या आंतरराष्ट्रीय कृषी, फलोत्पादन व वनीकरण परिषद : मार्ग, विस्तार धोरणे व दृष्टिकोन या आंतरराष्ट्रीय परिषदेतील 'बेस्ट रिसर्च स्कॉलर पुरस्कार' बहाल करण्यात आला.



ही परिषद कृषी, उद्यानविद्या व वनीकरण: दिशा, विस्तार धोरणे व उपाय या विषयावर आधारित होती. १८ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान विवेकानंद ग्लोबल युनिव्हर्सिटी (भारतीय कृषी अनुसंधान परिषद मान्यताप्राप्त), जयपूर येथे ती आयोजित करण्यात आली होती. परिषदेचे आयोजन कृषि-पर्यावरण शिक्षण व शेतकरी कल्याण संस्था या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.

या परिषदेत देशभरातून शास्त्रज्ञ, अभ्यासक व क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. श्री. मुजमुले यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पाचे उच्च मूल्यांकन करत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. कृषी व अन्न तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांच्या नाविन्यपूर्ण कार्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे. पुरस्कार प्रदान करताना कृषि-पर्यावरण शिक्षण व शेतकरी कल्याण संस्था चे अध्यक्ष डॉ. डी. एस. भोवाल यांनी श्री. मुजमुले यांच्या संशोधनात सामाजिक बांधिलकी आणि शाश्वत शेतीच्या दृष्टीकोनाचा उल्लेख केला. श्री. पप्पू मुजमुले यांना मिळालेला हा सन्मान नव्या संशोधकांसाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे संशोधक मार्गदर्शक डॉ. डी. एच. कणखरे व डॉ. डी. के. कांबळे, विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी त्यांचे कौतुक केले.



नेकनूर येथे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा शिवसेना नेते मा.ना.श्री.भरत शेठ गोगावले यांनी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांच्या ऑफिस ला भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, उपसरपंच सचिन शिंदे, युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र होमकर, बबलू सय्यद, गणेश काळे, अशोक शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## आवाड एज्युकेशनल अकॅडमी, केजच्या १८ विद्यार्थ्यांची डॉ.सी.व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेमधून इस्त्रो अभ्यास सहलीसाठी निवड

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आलेल्या आवाड एज्युकेशनल अकॅडमी केजच्या१८ विद्यार्थ्यांनी सी. व्ही.रमण बाल वैज्ञानिक परीक्षेत बाजी मारली. अकॅडमी ची ईयत्ता ८ वी ची विद्यार्थिनी हिंदवी यादव ही जिल्ह्यातून दुसरी तर गौरी ससाणे ही चौथी आली. सदरील परीक्षा जनसेवा सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक कला व क्रीडा प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने मार्च २०२५ मध्ये आयोजित केली होती.

इस्रो ही भारतीय अंतराळ संशोधन संस्था आहे येथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात उपग्रह, अवकाश यान बनवणाऱ्या वैज्ञानिकांसोबत संवाद साधता येणार असल्यामुळे केज येथील विद्यार्थ्यांची निवड झाल्याले बाल वैज्ञानिक अतिशय आनंदी आहेत. यावर्षी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी शाहू कॉलेज स्क्रिनिंग टेस्ट, ऑलिम्पियाड परीक्षा, स्कॉलरशिप व सैनिक स्कूल परीक्षे सोबतच सी.व्ही.रमण परीक्षेत ही घवघवीत यश मिळवले आहे. या



परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आज दिनांक ११ जून रोजी पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. हनुमंत भोसले तर प्रमुख पाहुणे रघुनाथ बनसोडे हे उपस्थित होते. पालक प्रतिनिधी म्हणून लांडगे मॅडम या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.विठ्ठल आवाड यांनी तर आभार प्रदर्शन सौ. सीमा आवाड यांनीकेले. निवड झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे Class 5 १.अनुज राहुल चाळक (ढरश्रींज़र २), २.आरव विठ्ठल आवाड (ढरश्रींज़र ३), Class 6 ३.अमृता अशोक आवाड (ढरश्रींज़र १), ४.ईश्वरी रामकिसन सांगळे (ढरश्र. २) उश्ररींी ७ ५.गौरी दादासाहेब ससाणे (ऊळींीं. ४) ६.गिरी हरिओम गणेश (ढरश्र १) ७.तुषार विकास पोवळे,(ढरश्र २) ८.साक्षी वैजनाथ धस (ढरश्रींज़र ३) ९.काळे विवेक वैजनाथ (ढरश्र. ४) उश्ररींी ८ १०.हिंदवी विष्णु यादव (ऊळींीं. २) ११.अदित्य राजाभाऊ डोईफोडे (ढरश्र.१) १२.जयराज हरिभाऊ कांबळे (ढरश्र. २) १३.श्रेयश भास्कर लांडगे (ढरश्र. ३) उश्ररींी ९ १४.अकांक्षा दिपक सांजुरे (ढरश्र. १) १५.श्रेयश रघुनाथ बनसोडे (ढरश्र. १) १६.अभिनव श्रीहरी भिसे (ढरश्र. २) १७.सई बालाजी साखरे (ढरश्र. ३) १८.प्रज्ञा दिनकर घुले (ढरश्र.४).

## श्रावस्ती बुद्ध विहार येथे भदंत धम्मशील थेरो यांच्या प्रवचनाचा लाभ घ्यावा : विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे दिनांक १४ जून २०२५ शनिवार रोजी पूज्य भंते धम्मशील तेरो यांचे प्रवचन सकाळी ११ वाजता होणार असून या प्रवचनास सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित रहावे असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांनी केले आहे या प्रसंगी मान्यवरांचा गुणगौरव व बुद्ध धम्म दर्शन सहलीला गेलेल्या बौद्ध उपासक उपासिका यांचे गुणगौरव ही करण्यात येणार आहे.



माजलगाव तालुक्यातील बौद्ध उपासिका उपासक उपासिका यांच्यासाठी आनंदाची बाब म्हणजे गेल्या आठ मे २०२५ ते २५ मे २०२५ या कालावधीमध्ये माजलगाव शहरातील व तालुक्यातील श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका हे हे भारतासह जगातील बुद्धांचे पवित्र स्थान बुद्धगया महाबोधी महाविहार येथे व भारतातील व नेपाळमधील इतर काही विश्ववंदनीय तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जीवनातील घडलेली महत्त्वाच्या घटनास्थळ यांचे दर्शन घेण्यासाठी तथागत भगवान बुद्ध यांचे जन्मस्थळ कपिल वस्तू सह विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो बौद्ध अनुयायांसह धम्मदीक्षा घेतली ते जगातील बुद्धांचे पवित्र प्रेरणास्थान दीक्षाभूमी नागपूर पासून ही सहल सुरू झाली व सारनाथ बुद्धगया, डुंगेश्वरी, राजगिरी, नालंदा, वैशाली, कुशीनगर, नेपाळ येथील लुंबिनी, काठमांडू, पोखरा, कपिलवस्तू, लखनऊ, सांचीबुद्धविहार, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ मध्य प्रदेश महू तसेच महाराष्ट्रातील अजिंठा लेणी, चौका बुद्ध विहार सह विश्ववंदनी तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील पवित्र आणि महत्त्वाच्या स्थळांना भेट देऊन ही बुद्ध दर्शन सह माजलगाव शहरात सुखरूप पोहोचली. त्या बुधदर्शन सहलीला गेलेल्या सर्व ५० बौद्ध उपासक उपासिकांचा गुणगौरव व इतरही बौद्ध उपासक उपासिका यांचा गुणगौरव याप्रसंगी करण्यात येणार आहे व पूजनीय भदंत धम्मशील थेरो बुद्ध विहार शिवणी बीड यांचे प्रवचन श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे होणार आहे व त्यानंतर भोजनदान देण्यात येणार आहे तरी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी या धम्म प्रवचन धम्मदेसनेचा लाभ घ्यावा, असे आवाहान रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांच्यासह आयु. कचरू तात्या खळगे, आयु. कांशीरामभाऊ साळवे, सुधाकरराव जावळे, आयु. प्रभाकरराव साळवे, आयुष्यमानी सत्वशीलाताई सोनपसारे यांच्यासह सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी केलेले आहे तरी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी शुभ्र वस्त्र घालून या १४ जून २०२५ रोजी होणाऱ्या धम्म प्रवचन कार्यक्रमास श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कॅम्प येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

पान १ वरून...

### केज पोलिसांनी तीन सराईत चोरांच्या आवळल्या मुसक्या

गेले. त्यापैकी एकाने त्याचे कंबरेतुन एक चाकु काढले व माझ्या गळयाला लावुन तुझ्या खिशातील जेवढे पैसे आहे ते काढुन दे. नाही दिले तर जिवेच मारुन टाकुत अशी धमकी दिली. त्या तिघांनी बळजबरीने त्याच्या खिशातील २ हजार रुपये काढुन घेतले. त्या नंतर अमरजित धपाटे याने आरडा ओरड केली ते ऐकून असता बसस्थानक मधील काही लोक आणि बस स्टँड परिसरातील पोलिस मदत केंद्रात कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपणे आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल विष्णू नागरगोजे प्रवाशी धावून आले. पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपणे आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल विष्णू नागरगोजे पोलिसांनी त्यांच्या मदतीने पळून जाणाऱ्या तिघांच्या मुसक्या आवळल्या. ताब्यात घेतलेले संशयितांची नावे अन्वर ऊर्फ असलम दस्तगीर सय्यद, (रा. वडसावीत्री नगर परळी ता. परळी जि.बीड), अंबादास सुखदेव साळोकार, वय (४४ वर्ष), (रा. घारपुरी ता. खामगाव जि. बुलढाणा) आणि हमीद दाऊत शेख, (रा. धारुर जि. बीड) अशी आहेत.

### जिल्हाभरातील सेतू केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी

योजनेचा पुढील हप्ता, बियाणे व खते अनुदान, महाडीबीटी पोर्टलवरील सर्व अर्जासाठीही या आयडीची गरज भासणार आहे. सद्यस्थितीत शेतकरी खरीप हंगामात व्यस्त असताना या हंगामात शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी काढण्यासाठीही धडपडताना दिसत आहे. वीज, इंटरनेटचा खोडा: राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी आता फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आली. शासनाच्या विविध कृषी योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी हा आयडी आवश्यक आहे. अन्यथा शासनाच्या योजनांपासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते, असे शासनाने आदेशात स्पष्ट केले आहे. त्यामुळे सध्या जिल्ह्यातील शेतकरी फार्मर आयडी बनविण्यात व्यस्त आहेत. मात्र विजेचा लपंडाव आणि इंटरनेटचा खोडा कायम असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

### संपादक शेख मुजीब यांना पत्रकारितेचा मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

प.पु.१००८ महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, जालन्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, परभणीच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, राज्यसभेचे खा.डॉ.भागवत कराड, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आ.प्रदिप जैस्वाल, आ.प्रशांत बंब, आ.संजय केनेकर, आ.संजनाताई जाधव, आ.अनुराधाताई चव्हाण, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडलाचे अध्यक्ष जयदिप कवाडे, जेष्ठ पत्रकार मधुकरआण्णा वैद्य, माजी महापौर नंदकुमार घोडेले, डिजीटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे तर विशेष अतिथी म्हणून एबीपी माझ्याच्या संपादीका सरितताई कौशिक, प्रसिध्दी अभिनेते योगेश सिरसाट, बंगरूळूच्या पुर्णब्रम्ह प्रशासकीय संचालिका जयंतीताई कठाळे यांची उपस्थिती राहणार आहे. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटनीस डॉ.विश्वास आरोटे, प्रदेशउपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, राज्यसमन्वयक नितीन शिंदे, प्रदेश प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, कार्याध्यक्ष निलेश सोमानी आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सकाळी १० वाजता भारतीय माध्यमांचा डीएनए कोणता ? माध्यमांचे भूत, वर्तमान आणि भविष्य या विषयावर परिसंवाद आयोजीत करण्यात आला आहे. यामध्ये संवादिका अश्विनीताई डोके यांच्यासह एबीपी माझ्याच्या संपादिका सरिताताई कौशिक, माजी कुलगुरू सुधीर गव्हाणे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, संजय सोनवणी, ॲड.महेश भोसले, अविनाश वानखेडे आणि ॲनालायझरचे संपादक सुधीर कुलकर्णी हे वक्ते सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, जिल्हाध्यक्ष डॉ.छबुराव ताटे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथील सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

### बीड शहरचे पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

लाखांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी महिला जेरबंद केली. या सर्व कामगिरीची दखल घेऊन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करीत पाठीवर कौतुकाची थाप मारली आहे. तर बल्लाळ यांनी ही माझ्या एकट्याचा नव्हे तर ठाण्यातील सहकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

## बीड नगरपालिकेने मुक्या जनावरांचा कोंडवाडा बंद करून गोशाळेत आम्ही जनावर पाठवतो म्हणून खटकांच्याच्या ताब्यात देऊन कुठला पुरुषार्थ साध्य केला आणि केलेले पाप नगरपालिका कुठे फेडणार

# तब्बल बीड शहरात ५० मुक्या जनावरांचे मुंडके आले आढळून : शिराळे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नगरपालिकेच्या वतीने खासबाग लेडी रोड बीड येथे जनावरांसाठी कोंडवाडा चालू होता तो कोंढवाडा अचानकपणे बंद नगरपालिकेने करून मुक्या जनावरांना खाटकाच्या दावणीला बांधण्याचे विडे उचलले आहेत का काय अशा प्रकारचा प्रश्न सध्या बीड शहरातील नागरिकांना पडला आहे. बीड शहरातील स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये ५० मुक्या जनावरांचे मुंडके आढळून आल्याचे वृत्त बीड शहरांमध्ये वर्तमान पत्राच्या माध्यमातून माध्यमातून पसरताच अनेक बीड शहरातील नागरिकांमधून संतापाची लाट निर्माण झाली आहे. देशामध्ये नरेंद्रभाई मोदीचे सरकार आहे आणि राज्यांमध्ये देवेंद्र भाऊ यांचे सरकार आहे परंतु बीड शहरांमध्ये अंधारे मॅडम यांचे अंधाराचे राज्य कायम आहे हे बीडकरांसाठी दुर्दैव आहे. नगरपालिकेच्या वतीने जनावरांसाठी कोंडवाडा आहे त्यांच्यासाठी चाऱ्याची देखील व्यवस्था नगर प्रशासनाच्या वतीने करण्यात येते परंतु कोंडवाडा बंद करून आणि चारा जनावरांचा बंद करून नेमका नगरपालिकेने कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे आणि असे निष्पाप मुक्या जनावरांचे प्राण कुठपर्यंत नगरपालिका घेऊन याचे पाप कुठे फेडणार हा देखील प्रश्न आता बीड शहरातील तमाम नागरिकांना पडला असल्याचे बीड नगरपालिकेचे माजी सभापती तथा भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे. बीड शहरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे मुख्य जनावरे बिचारे रस्त्याने फिरत आहेत. अचानकपणे गोभक्तांच्या गाडीच्या समोर ते येऊन आम्ही नेमके आता जायचे कुठे असा प्रश्न देखील आता गोभक्तांना मुके जनावरे विचारत आहेत याच पार्श्वभूमीवर नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे बीड शहरातून प्रवास करत असताना त्यांच्या गाडीच्या समोर एक गोमाता येऊन उभा राहिले आणि आपल्या व्यथा अण्णांच्या समोर मांडू लागली हा प्रसंग प्रत्यक्षात बिड करांना पहावयास मिळाला म्हणून आता गोमातेचे रक्षण होण्यासाठी गोवंशाचे रक्षण होण्यासाठी भाजपाचे नेते नवनाथांना शिरोळे पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री नामदार श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्याकडे देखील फॅक्स द्वारे तक्रार केली आहे आणि बीड शहरातील बिघडलेली नगर प्रशासनाचे घडी पूर्वपदावर आणण्यासाठी आपण सातत्याने शासन प्रशासन दरबारी आमचे नेत्या पंकजाताई मुंडे ताई साहेबांच्या माध्यमातून आवाज उठव व झोपलेले नगर प्रशासन हे जागे केल्याशिवाय आता आम्ही स्वस्त बसणार नसल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. आंधरे मॅडम सीओ यांना स्थानिक राजकीय नेत्यांनी देखील फोन केले तर त्यांचा देखील फोन अंधारे मॅडम उचलत नाहीत एवढा मगरूळपणा बरोबर नाही. अंधारे मॅडम उघडा डोळे आणि बघा नीट बीड शहरामध्ये नेमके चालले आहे काय कमीत कमी गोवंशासाठी तरी आपले नगर प्रशासन जागे करा आणि बीड शहरांमध्ये गल्लीबोळामध्ये गोवंश चोरण्यासाठी येणारी कसाई याची टोळी पकडून त्यांना जेरबंद करून जेलची हवा दाखवा व बीड शहरामध्ये प्रत्येक गल्लीबोळामध्ये फिरणाऱ्या गाई आणि वासरे हे बीड नगरपालिकेच्या वतीने कोंडवाडा चालू करून त्यांना त्या ठिकाणी ठेवा आणि या होणाऱ्या गोहत्या बंद करा आणि त्यांची पूर्ण व्यवस्था करा अन्यथा बीड शहरातील तमाम नागरिक आपल्याला स्वस्थ बसू देणार नाहीत याची देखील आपण दक्षता घ्यावी असे देखील प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या ५० गो वंशाचे मुंडक्यामुळे बीड शहरातील तमाम नागरिकांमध्ये नगर प्रशासनाच्या व सीओ नीता अंधारे मॅडम यांच्या अंधाराच्या कार्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे आता तरी जिल्हाधिकारी यांनी स्वत: लक्ष घालावे आणि पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री या मुक्या जनावरांच्या बाबतीत तात्काळ दखल घेतील आणि या दोषी नगर प्रशासनावर कारवाई करतील, असी अपेक्षा ही बीड शहरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.





# १५ जून रोजी पत्रकार संघाच्या रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित रहा : संपर्कप्रमुख वैभव स्वामी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत मराठवाडा विभागाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भूषण पुरस्कार सोहळा २०२५ हा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजी नगर येथील संत एकनाथ रंग मंदिर उस्मानपुरा येथे होणार आहे. या पत्रकारांच्या अधिवेशनाला मराठवाड्यातील, राज्यातील पत्रकारांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे रौप्य महोत्सवी मराठवाडा विभागीय अधिवेशन रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी होणार आहे. सदरील अधिवेशन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीनजी शिंदे, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, राज्य उपाध्यक्ष अशोक देडे यांच्या विशेष सहकार्यातून मराठवाडा विभागीय अधिवेशनाचे आयोजक अनिल सावंत संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर छबुराव ताके यांची संपूर्ण टीम यशस्वीपणे प्रयत्न करत आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन सामाजिक न्याय



मंत्री संजयजी शिरसाट यांच्या शुभहस्ते होणार आहे. या कार्यक्रमास महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज अध्यक्ष म्हणून लाभणार आहे तर प्रमुख अतिथी म्हणून नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, जालन्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी हिरवळ, परभणीच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष जयदीपजी कवाडे, प्रसिद्ध अभिनेते योगेश शिरसाट, एबीपी माझा मुंबईच्या संपादिका सरिता कौशिक आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या अधिवेशनामध्ये भारतीय माध्यमांचा नेमका डीएनए कोणता यावर परिसंवाद होणार आहे. या परिसंवादाचे उद्घाटक इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुलजी सावे यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे लाभणार आहेत. तर संवादिका म्हणून पुणे येथील ख्यातनाम अश्विनीताई डोके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या परिसंवादामध्ये सहभागी होणाऱ्या वक्त्यांमध्ये एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, माजी कुलगुरू सुधीर गव्हाणे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, पुणे येथील प्रसिद्ध विचारवंत संजय सोनवणी, संभाजीनगर येथील प्रसिद्ध वक्ते ॲड महेश भोसले, पुणे येथील प्रसिद्ध वक्ते अविनाश वानखेडे, संभाजीनगर येथील ऑनालायझरचे संपादक सुशील कुलकर्णी सहभागी होणार आहेत. पत्रकारांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वपूर्ण होणारा परिसंवाद आणि मान्यवरांच्या उपस्थितीत होणारे अधिवेशन तसेच मराठवाडा भूषण पुरस्कार २०२५ मध्ये संपूर्ण मराठवाड्यातील विविध क्षेत्रात, पत्रकारितेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रत्नांचा मान्यवरांच्या शुभहस्ते विशेष गुण गौरव करण्यात येणार आहे.

या शानदार सोहळ्याला आणि अधिवेशनाला मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका, ग्रामीण भागातून त्याचबरोबर राज्यातील पत्रकारांनी देखील मराठवाड्यामध्ये पहिल्यांदाच होणाऱ्या रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनाला छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित राहून या कार्यक्रमाचे साक्षीदार व्हावे आणि अधिवेशन न भूतो न भविष्यती साजरे करण्यासाठी पत्रकार आणि पत्रकार प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

# नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी आमदार सुरेश धस शेतकऱ्यांच्या बांधावर

आष्टी । प्रतिनिधी

राज्यभरात मान्सून दाखल होत असताना दि.११ रोजी अचानक झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांना तडाखा बसला आहे. जोरदार झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या फळबागा आणि इतर पिकांचे नुकसान झाले असून वीज पुरवठा खंडित झाला आहे या नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार सुरेश शेतकऱ्यांच्या बांधावर प्रशासनाला समवेत घेऊन पोहोचले आणि प्रशासनाला सूचना देऊन नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे आदेश दिले आहेत.

दि.११ जून रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांची फार मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक गावातील नागरिकांचे घरांची पडझड झाली असून आणि काही शेतकऱ्यांचे कुक्कुटपालन शेड, गोठे, आणि जनावरांची जीवितहानी झाली आहे. आष्टी तालुक्यातील पिंपरी आष्टी, बेलगाव, मुर्शदपूर, किन्ही, बावी, कापशी यासह पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, डागाची वाडी, उंडेवाडी, कोतन, पांढरवाडी, गांधणवाडी, साबळेवाडी, इतर गावांमध्ये अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळून तारा तुटल्या आहेत.



त्यामुळे सध्या विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. या गावांना भेटीत देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार सुरेश धस यांनी दिलासा दिला आहे. शेतकऱ्यांनी देखील आमदार सुरेश धस हे बांधावर आलेल्या आधार मिळयाच्या भावना व्यक्त केले आहेत. तर सकाळीच महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता डोंगरे, कनिष्ठ अभियंता, तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी, गट विकास अधिकारी ग्रामसेवक आणि गावातील प्रमुख कार्यकर्ते यांची तातडीने बैठक घेतली. यामध्ये काल झालेल्या पावसामुळे नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसेच प्रशासनाने अत्यंत काळजीपूर्वक शेतकरी आणि नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल आणि कृषी कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत.

तरीही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाशी संपर्क साधावा शासनाकडून नुकसान भरपाईसाठी आपण प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी शेवटी सांगितले. या पाहणी दरम्यान परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, मा. नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, माऊली जरांगे भाऊसाहेब भवर, सरपंच अशोक मुळे, इंद्रजीत गर्जे, अश्रूबा गोल्हार, कारभारी गर्जे, बाबू गर्जे, अशोक जेथे, महेश खेगरे, दादा बेदरे, पाचपुते मुकादम, गाडे सरपंच, पिनू पोकळे, अमोल पोकळे, बाळासाहेब सकुंडे, भाऊसाहेब ससे, तहसीलदार निलावड साहेब, कृषी अधिकारी पवार साहेब, राख साहेब, विस्तार अधिकारी, ग्राम विकास अधिकारी मंडळ अधिकारी तलाठी व कृषी सहाय्यक यांच्यासह महेश खेगरे, दादा बेदरे, पाचपुते मुकादम, गाडे यांच्यासह संबंधित कृषि विभाग, महसूल विभाग व बांधकाम विभाग आदी उपस्थित होते.

वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आंबा, उन्हाळी कांदा, कुकुट पालनाचे शेड, विजेचे खांब कोसळून तारा तुटल्या आहेत. वादळाचा वेग मोठा असल्यामुळे जुने मोठे वृक्ष उन्मळून पडले आहेत प्रशासनाकडून नुकसानीबाबत पंचनामे सुरू झाले आहेत तरीही कोणी वंचित राहू नये म्हणून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाकडे देण्यात यावेत शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

– सुरेश धस, आमदार, आष्टी

### अन शेतकऱ्याला अश्रू अनावर

पाटोदा तालुक्यातील डागाचीवाडी येथे आ. सुरेश धस नुकसानग्रस्त भागाचे पाहणी गेले असता अण्णा तुम्हीच आमचे आधार असल्याचे भावना व्यक्त करत असताना काल रात्रीचा प्रसंग सांगताना अश्रू अनावर झालेले पाहायला मिळणे तर आमदार धस यांनी देखील सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्याला दिलासा मिळाला.

### या गावांचा विद्युत पुरवठा सुरळीत

आष्टी व पाटोदा तालुक्यात काल झालेल्या वादळ वाऱ्यामुळे महावितरण विभागाच्या वितरण व्यवस्थेतील सर्व सबस्टेशनचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. आज सायं.४ वाजेपर्यंत तालुक्यातील ३०/११ के.व्ही. दाबाचे आष्टी, पोखरी, आष्टा ह.ना., जळगाव कडा कारखाना, कडा शहर, वाहिरा, पिंपळा डोईठाण, पारगाव जो, धामणगाव, दौलावडगाव हे सबस्टेशन दुरुस्त झाले आहेत. या सर्व सबस्टेशन चा विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरू केला आहे. आष्टी शहर व मुर्शदपूर शहरातील काही भागात विद्युत पुरवठा अद्याप सुरू झालेला नाही. तो उद्या दुपारपर्यंत सुरू होईल, असे उपाभियंता देशमुख यांनी सांगितले. पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, गांधनवाडी, पांढरवाडी डागाचीवाडी, कोतन, उंडेवाडी या गावांसाठी कोतन सबस्टेशन येथुन विद्युत पुरवठा केला जातो. त्या भागात मोठ्या प्रमाणावर विद्युत पोल पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित आहे. तरी पुढील दोन दिवसांमध्ये पोल उभारणी करून विद्युत पुरवठा सुरळीत होईल असे उपविभागीय अधिकारी सावकारे साहेब यांनी कळविले आहे. आ.सुरेश धस यांच्या समवेत बैठक करून महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता बुलबुले, अधीक्षक अभियंता राजपुत, कार्यकारी अभियंता डोंगरे यांनी आष्टी तालुक्यातील विद्युत वितरण व्यवस्थेत झालेल्या संपूर्ण नुकसानीची पाहणी करत दिवसभरात प्रत्यक्षपणे फील्ड वरती उभा राहून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी सहकार्य केले आहे.

# अर्चनाताई व राज पाटील दांपत्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्यचे पुरस्कार

## अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र पुरस्कार

वडवणी । प्रतिनिधी

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या अहिल्यानगर येथील राज्य स्तरावर काम करणाऱ्या नामांकित संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यातील तिगाव तालुका वडवणी येथील सरपंच सौ अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाला आहे. तर लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्यातील नामांकित सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र हा पुरस्कार या संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्यासह राज्यातील नामांकित राजकीय नेते मंडळीच्या उपस्थितीत १५ जून रोजी आहे अहिल्यानगर येथे होणार आहे.

राज पाटील आणि सौ अर्चना राज पाटील हे दाम्पत्य मागील अनेक वर्षापासून सामाजिक सेवेमध्ये आहे. तिगावचे सरपंच पद राज पाटील यांच्याकडे आल्यापासून या गावाचा कायापालट झाला आहे. या गावात विविध जलसंधारणाच्या गोष्टी राबविण्यात आले आहेत. पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना पाहिजे असेल तर तीगावाला जायला पाहिजे या गावातील विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. संक्रातीच्या दिवशी अर्चना पाटील यांनी महिलांना साहित्य न वाटता पुस्तक आणि झाडाचे वाटप वाण वाटले हा आदर्श उपक्रम राबवणारी महाराष्ट्रातील पहिली ग्रामपंचायत तिगाव ग्रामपंचायत ठरली आहे. गावात वृक्ष संवर्धनासाठी खूप मोठा पुढाकार घेण्यात आला आहे. अर्चना पाटील आणि राज पाटील यांनी तिगावच्या विकासासाठी





स्वतःला पूर्णपणे झोकून दिल आहे. त्यांनी स्वखर्चातून गावातील विविध वस्त्यांना या अगोदरच रस्ते करून दिलेले आहेत. गावातील सामाजिक सलोखा राखण्यासाठी ते नेहमी अग्रेसर असतात. सर्व जाती–धर्माचे लोक एकत्र गुण्या गोविंदाने नांदतात यामध्ये तिगाव अग्रेसर आहे. या गावाचा कायापालट करण्यासाठी आपण पाहिजे तेवढे प्रयत्न करणार असल्याचे राज पाटील आणि त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी निर्धार केलेला आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन अर्चना राज पाटील यांना या सरपंच सेवा संघाने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर केला आहे. तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर केला आहे. या नवरा बायकोचा एकाच व्यासपीठावर भास्करराव पेरे पाटील आणि राज्यातील नामवंत समाजसेवक व राजकारणीच्या हस्ते सत्कार आणि सन्मान होणार आहे. हा सोहळा १५ जून रोजी अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे.

### हा पुरस्कार सर्वसामान्य जनतेच्या सेवेची पावती

अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाला आहे तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दहा हत्तीचे बळ मिळते, पूर्वीही राज्यस्तरीय अनेक पुरस्कार राज पाटील यांना मिळाले आहेत. हा पुरस्कार जनसेवेची पावती आपल्याला मिळत असल्याची भावना ॲडव्होकेट राज पाटील यांनी प्रसार माध्यमांना बोलून दाखवली.

# शाळा सुरू होण्यापूर्वी स्कूल वाहनांच्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह; पालकांना सतर्कतेचे आवाहन : नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

येत्या १६ जून २०२५ पासून राज्यभरातील शाळा पुन्हा सुरू होत असताना, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्कूल बस आणि व्हॅनच्या फिटनेस सर्टिफिकेटची तपासणी करण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले आहे. बीडमधील नितीन सोनवणे ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा जिल्हाध्यक्ष बीड या सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात आवाज उठवला असून, जुन्या आणि खराब झालेल्या वाहनांना शाळांसाठी परवानगी देऊ नये, सोनवणे यांनी अशी मागणी बीड ठढज कडे केली आहे.



पालकांना उद्देशून एका निवेदनात म्हटले आहे की, आपल्या मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी स्कूल वाहनांची योग्य देखभाल आणि वैध फिटनेस प्रमाणपत्र असल्याची खात्री करा. जुन्या वाहनांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात बीड ठढज ने कठोर नियम लागू करावेत आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, ऑल इंडिया पँथर सेना बीड च्या वतीने अशी मागणीही करण्यात आली आहे. अपघात किंवा कोणतीही हानी झाल्यास याची जबाबदारी बीड ठढज ची असेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

बीड पोलिस आणि जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनाही याबाबत लक्ष घालण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी SchoolSafety, BeedRTO, SafeTravel, FitnessCertificate या हॅशटॅग्सद्वारे सोशल मीडियावर जनजागृती सुरू केली आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या सुरक्षेसाठी सतर्क राहावे आणि वाहनांची तपासणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### पालकांची भूमिका महत्त्वाची

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पालकांनी स्वतःहून स्कूल बस किंवा व्हॅनच्या कागदपत्रांची पडताळणी करणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित आणि निर्धास्त होईल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. बीड ठढज कडून याबाबत कोणती पावले उचलली जाणार, याकडे बीड जिल्ह्यात या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिवसेनेच्या दणक्याने सिरसाळा जागा हस्तांतरित प्रश्न मार्गी

सिरसाळा । प्रतिनिधी

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका शेजारील कृषी विभागाच्या जागेत बस स्टँड उभारण्यासाठी माननीय नामदार प्रतापजी सरनाईक साहेब यांनी तातडीने आदेश देऊन योग्य योग्य ते कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने शासनाने जागा हस्तांतरित ची कारवाई करून शिरसाळाकरांचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे यासाठी शिवसेनेचे युवा नेते कैलास कावरे गेल्या अनेक दिवसापासून सिरसाळा शिवसेनेच्या वतीने युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यासाठी नामदार प्रतापजी सरनाईक साहेब यांच्याकडे व प्रशासनातील जिल्हाधिकारी डऊज, असतील परळी तहसीलदार व नायब तहसीलदार व परिवहन विभागाचे बांधकाम व्यवस्थापक दिनेशजी महाजन साहेब असतील.

विभागीय नियंत्रक मंजुळे साहेब असतील गेल्या अनेक दिवसापासून सातत्याने यांच्याकडे सिरसाळा शहर शिवसेनेच्या वतीने शिवसेना नेते कैलास कावरे हे पाठपुरावा करत होते आपल्या आता हे काम लवकरच प्रगतीपथावर होईल राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे, संसद रत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, परिवहन मंत्री नामदार प्रतापजी सरनाईक, परिवहन मंत्री यांचे व युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेस भाई सरनाईक व युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांचे शिवसेना नेते कैलास कावरे यांनी आभार व्यक्त केले.



वेलतुर येथील शेतकरी बाळु विठोबा बोरकर यांच्या घराचे पाठीमागची भिंत अवकाळी पावसाने कोसळली असल्यामुळे या त्यांचे घर उपयोगी साहित्य व धान्याची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली त्यामुळे हे कुटुंबात उघड्यावर आली आहे. या पडजडीचा पंचनामा तलाठी नागले साहेब यांनी केला असून आम्हाला शासनाकडून काहीतरी मदत मिळावी अशी मागणी त्यांनी केली आहे.
(छायाचित्र : सुरेश कांबळे आष्टी)

# नवयुवक तरुणावर नियतीने घातला काळाचा घाला

घाटनांदुर । प्रतिनिधी



येथील नवयुवक तरुण धनंजय राजाभाऊ जाधव (देशमुख) वय वर्ष २४ हा तरुण मुलगा सकाळी शेतीकड कामासाठी गेला असता १३/०६/२५ रोजी शुक्रवारी ९ च्या दरम्यान शेतातील विद्युत प्रवाह असणाऱ्या वाहिनीचा जोराचा झटका लागल्याने तो जागीच कोसळला व त्याला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे दाखल केले असता तिथे धनंजयला मृत घोषित करण्यात आले.

धनंजय हा गुणी व सर्वांत वावरणाऱ्यापैकी एक हसतमुख चेहरा होता त्याच्यावर काळाने घाला घातला ही धनंजयन अस अचानक होत्याच नव्हतं होण, सर्व सोडून या जगातून जाण ही बातमी सर्वत्र पसरली आणि घाटनांदूर गावावर शोककळा पसरली. धनंजय हा एकुलता एक घरातील असल्यामुळे हे दुःख त्याच्या कुटुंबांना पचणारा नाही.

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची नविन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक तर उपाध्यक्षपदी मंजुषा जोशी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक यांची तर सचिवपदी मंजुषा जोशी यांची सन २०२५–२०२६ या नविन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ही संस्था गेल्या अनेक वर्षापासुन अंबाजोगाई शहर व परिसरात सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले. उपेक्षीत व वंचितासाठी रोटरी क्लबचे विविध प्रकल्प सातत्याने कार्यरत असतात. याही वर्षी रोटरी क्लबची सन २०२५–२०२६ या कालावधीसाठी नविन कार्यकारीणी जाहिर करण्यात आली आहे.





यात अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव–मंजुषा जोशी, सहसचिव–राधेश्याम लोहिया, कोषाध्यक्ष सचिन बेंबडे, क्लब ट्रेनर विश्वनाथ लहाने, कल्याण काळे, डॉ.निशिकांत पाचेगावकर, क्लब डमिन जगदीश जाजू, सार्जंट डॉ.अनिल केंद्रे, द रोटरी फाउंडेशन डायरेक्टर डॉ.नवनाथ घुगे, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून सुनंदा मुंदडा डॉ. बाळासाहेब लोमटे, प्रा रमेश सोनवलकर, आनंद जाजू, स्वरूपा कुलकर्णी, बालाजी घाडगे, प्रा.शैलजा बरुरे, राजेंद्र घोडके, भीमसेन लोमटे, सुरेश मोदी, प्रवीण चौकडा, अंगद कराड, डॉसचिन पोतदार, गणेश राऊत, शकील शेख, डॉ.अरुणा केंद्रे, डॉ.अतुल शिंदे, गोरख मुंडे, बाळासाहेब कदम, गोपाळ पारीख, अमृत महाजन, अजित देशमुख, अनिल लोमटे, रुपेश रामावत, कल्पना बेलोकर, ओमकेश दहिफळे, प्रदीप झरकर यांची निवड करण्यात आली आहे.

रोटरी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वंचितांसाठी, दिव्यांगासाठी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याची रोटरीच्या अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक व सचिव मंजुषा जोशी यांनी सांगितले. रोटरी क्लबच्या या नुतन पदाधिकार्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बच्चु भाऊ कडु यांच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील अन्नत्याग आंदोलनास बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पाठींबा देण्याची गरज : ढाकणे

बीड । प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू भाऊ कडू हे मोझरी येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अन्नत्याग आंदोलन करत आहेत. त्यांच्या आंदोलनाला बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पाठींबा दिला पाहिजे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केले आहे. बच्चू भाऊ सदैव लोकहिताच्या कार्यात सहभागी असणारे व्यक्तिमत्त्व आहेत ते शेतकऱ्यांच्या कल्याणसाठीच हे आंदोलन छेडत आहेत तर आपणही या आंदोलनात सहभागी होण्याची आवश्यकता आहे असे वाटते असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होणाऱ्या आंदोलनाला बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पाठिंबाही दिला पाहिजे. शेतकरी कर्जमाफी असूदे की, हमीभाव... मायबाप शेतकऱ्याच्या प्रत्येक मुद्यावर बच्चु भाऊ कडु ठाम भूमिका घेतात. त्याचं बरोबर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी सातत्याने केंद्रीय पातळीवर कर्जमाफी आणि हमीभावाचा मुद्दा लावून धरला. किंबहुना कॉंग्रेसचे सरकार



केंद्रात आणि राज्यात सत्तेत असताना शेतकऱ्यांना दिलासा देत संपूर्ण कर्जमाफीचा निर्णयही घेतला होता. पण सध्याच्या राज्य सरकारने निवडणूक जाहीरनाम्यात उल्लेख करूनही शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली नाही हे अतिशय दुर्दैवी आहे.

महाराष्ट्रात २०२४ मध्ये २,६३५ तर मागच्या ६ महिन्यांत ८६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. डोक्यावरचं कर्ज, नापीकी, अवकाळी पाऊस तसेच सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांना कंटाळून शेतकऱ्यांनी आपलं जीवन संपवलं आहे. यात विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येचा आकडा मोठा आहे. राज्यातल्या महायुती सरकारने सत्तेत यायच्या आधी शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन दिलं. पण सत्तेत येताच शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसण्याचं काम केलं.

भाजप आणि महायुती सरकारचे घटक राहिलेल्या बच्चू कडू यांच्या आंदोलनाला सहा दिवस उलटतायत. त्यांची साधी दखलही या निगरगट्ट सरकारने घेऊ नये? आज या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी बच्चू कडूयांनी मांडलेल्या मुद्यांना गांभीर्याने घ्यावं. तसेच त्वरित शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घ्यावा. नसता महाराष्ट्र राज्यातील शेतकरी हातात रुमणे घेऊन सत्ताधारी आमदार आणि मंत्र्यांच्या डोक्यात रुमणे घातल्याशिवाय राहणार नाही याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र राज्यातील शेतकरी संकटात सापडलेले असुन त्याला आता मदतीची गरज आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

# पाच महिन्याचे थकीत मानधन तत्काळ द्या

## आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे

बीड । प्रतिनिधी

जानेवारी २०२५ पासून पाच महिन्यांचे मानधन थकीत असल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांनी अखेर रस्त्यावर उतरून आपल्या मागण्यांसाठी लढा पुकारला आहे. महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघाच्या वतीने १३ जून २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेसमोर दुपारी १२.३० वाजता धरणे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू होते.




या आंदोलनाच्या निमित्ताने शासनाच्या दिरंगाईविरोधात संतप्त भावना व्यक्त करताना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख, प्रदेश कार्याध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, आणि जिल्हाध्यक्ष सचिन आंधळे यांनी सांगितले की, गेल्या पाच महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे अनेक आशा व गटप्रवर्तकांना उपासमारीची वेळ आली आहे. काही महिलांना घर चालवण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे, तर काहींना दौऱ्याच्या खर्चासाठी उसनवारी करावी लागत आहे.

राज्य शासनाकडून एप्रिल २०२५ चे मानधनाचा निधी जिल्हा प्रशासनास प्राप्त झालेला असूनही तो अद्याप वितरीत झालेला नाही, ही बाब विशेष चिंतेची असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. बायोमॅट्रिक हजेरीची सक्ती, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील थकीत मोबदला, तसेच ऑनलाईन कामांसाठी आवश्यक मोबाईल, सिम कार्ड व रिचार्जसाठी शासनाकडून कोणतीही सुविधा दिली जात नसल्याच्या तक्रारीही यावेळी मांडण्यात आल्या.

गटप्रवर्तकांकडून कोणते नोंदी व कागदपत्रे मागवायचे याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना न दिल्याने गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या कामाच्या स्वरूपात सुसूत्रता आणण्यासाठी आशा डायरीप्रमाणे रेकॉर्ड डायरी देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच वेतन चिठ्ठी नियमितपणे देण्यात यावी आणि दर तीन वर्षांनी गटप्रवर्तकांकडील रेकॉर्ड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात जमा करण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही यावेळी मांडण्यात आली.

या मागण्यांबाबत जिल्हा प्रशासनाने त्वरित शिष्टमंडळाशी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. जिल्हा अतिरिक्त आरोग्य अधिकारी आठवले, जिल्हा समन्वयक श्री बादाडे साहेब यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या आहेत प्रमुख मागण्या थकीत मानधन त्वरीत अदा करावे, एप्रिल २०२५ चे राज्य निधीतील मानधन तत्काळ वितरीत करावे, गटप्रवर्तकांना बायोमॅट्रिक सक्ती रद्द करावी. प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील थकीत मोबदला देण्यात यावा, ऑनलाईन कामांसाठी मोबाईल फोन, सिम कार्ड आणि रिचार्जसाठी निधी द्यावा, दरमहा नियमित वेतनपत्रक देण्यात यावे, गटप्रवर्तकांसाठी स्पष्ट रेकॉर्ड गाईडलाईन्स व डायरी पुरवठा करावा, दर तीन वर्षांनी रेकॉर्ड गोळा करण्याची प्रक्रिया निश्चित करावी.

### थकित मानधन तत्काळ द्यावे

तुटपुज्या मानधनावर काम करूनही पाच महिने मानधन मिळत नसल्याने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांवर उपासमारीची वेळ आली आहे. एप्रिल २०२५ करीता राज्य निनिधीतून मिळणाऱ्या मानधनाचा निधी जिल्हा प्रशासनास प्राप्त झाला असतांनाही मानधन मिळाले नाही. जिल्हा प्रशासनाने त्वरित सर्व मागण्या मान्य कराव्या अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल.

**– सचिन आंधळे,** जिल्हाध्यक्ष

# परळीकडून लातूरमार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा द्या

## राजेभाऊ फड यांचे रेल्वे मंत्र्यांना पत्र

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग आहे. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर परळी वैजनाथ रेल्वे स्थानक हे जिल्ह्यातील सर्वात जुने आणि एकमेव स्थानक असून येथील प्रवासी संघटनांच्या काही प्रमुख मागण्या आहेत. त्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत.

याबाबत अधिक असे की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे अनेक रेल्वे प्रवाशांनी विविध समस्या मांडल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच सिकंदराबाद विभागाचे व्यवस्थापक यांना पत्र लिहून प्रवासी संघटनेच्या मागण्या पोचवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने म्हटले आहे की, परळी वैजनाथ येथून लातूररोड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना मतदारसंघातील घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा. जेणेकरून परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि रेणापूर तालुक्यातील प्रवाशांची सोय होणार आहे. याचबरोबर कोरोना महामारीच्या काळात काही रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यापैकी अमरावती – पुणे तसेच काकीनाडा – साईनगर (शिर्डी) या गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार नियमित सुरू ठेवण्यात याव्यात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता काही गाड्यांच्या डब्यांच्या संख्येत गरजेनुसार वाढ करण्यात यावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही अशा आशयाचे पत्र राजेभाऊ फड यांनी प्रवासी संघटनांच्या आग्रहास्तव केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठवले आहे.

# गेवराई विधानसभा निवडणुकीत यशस्वी नगर परिषदच्या निवडणुकीत किंगमेकर ठरणार : विजयसिंह पंडित

## सहकार्याची जाणीव असणाऱ्या राजाची प्रजा कधीच साथ सोडत नाही : सय्यद अल्ताफ

गेवराई । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत विजयसिंह पंडित यांनी तब्बल ४२ हजार मताची लीड घेऊन गेवराई मतदार संघाचे आमदार म्हणून निवडून आले आणि येणाऱ्या काळात नगरपरिषद निवडणूक काही महिन्यांवर येऊन थांबलेली आहे नगरपरिषद निवडणुक पण विजयसिंह पंडित त्याच ताकतीने जिंकणार आहे कारण की विजयसिंह पंडित हे गेवराई तालुक्याचे जनतेशी जोडले गेलेला नेता आहे व आपल्या कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम करणारा नेता आहे गेवराई तालुक्याचे जनतेने आता ठरविलेला आहे की विजयसिंह पंडित यांना नगरपरिषद निवडणुकीत पण त्याच जोमात मतदान करून निवडून द्यायचं आहे.



विजयसिंह पंडित यांची कार्यकीर्द मादळमोही या जिल्हा परिषद गटातून झालेली असुन प्रत्येक गोष्टीची जाण असणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे तरुण वयापासून शिवछत्र या नावाचे रोपटे लावून त्यांनी बीड जिल्ह्यासह तालुक्यात मोठे वर्चस्व निर्माण केले आहे. गेवराई तालुक्यातील तरुणासह ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी स्वाभिमानी युवा बिग्रेड या छोट्याशा शाखेतून त्यांनी त्यांच्या कार्यकर्दीत उत्कृष्ट ओळख निर्माण केली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अल्पशा मताने विजयसिंह पंडित साहेबांचा पराभव झाला परंतु नख खचता पुन्हा नव्या उमेदीने गेवराई तालुक्यातील मायबाप जनतेसाठी ते पुन्हा राजकारणात सक्रिय झाले आणि २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने माजी आमदार अमरसिंह पंडित व जयसिंह पंडित या दोन्ही बंधूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विधानसभेवर झेंडा फडकविला असे असताना होऊ घातलेल्या गेवराई नगर परिषदेच्या येणाऱ्या निवडणुकीत ते निश्चितपणाने पालिकेवर सत्ता काबीज केल्याशिवाय मागे हटणार नाहीत त्यामुळे शहरातील मायबाप जनतेला त्यांच्यावर निश्चितपणाने विश्वास आहे की विजयसिंह पंडित साहेबांचा विश्वास लोकांच्या हितासाठी ठरेल यामुळे त्यांचे बंधू जयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली ते येणाऱ्या काळात नगरपरिषद गेवराई या कार्यालयावर विजयाचा झेंडा फडकविणारच असे मत कार्यकर्त्यांकडून व्यक्त केले जात आहे.

# परळी तालुक्यातील दैठणाघाट येथील मातंग समाजाच्या सरपंचांच्या कुटूंबास जिवे मारण्याची धमकी

परळी । प्रतिनिधी

मातंग समाजाचे सरपंच असलेल्या पतीच्या पत्नीला रस्त्यात अडवून तुझा नवरा ग्रामपंचायतच्या कामामध्ये नाक का खुपसतो? म्हणत चक्क सरपंचांच्या कुटुंबांसच शिवीगाळ आणि जिवे मारण्याची धमकी जातीयवादी मानसिकता असलेल्या गावगुंडांनी दिल्याचा प्रकार बहुचर्चीत परळी तालुक्यातील दैठणाघाट गावात घडला आहे. काल दि.१० जून रोजी या प्रकरणी परळी ग्रामिण ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या ट्रॉसिटी क्टसह इतर कलमानुसार गावातील हनुमंत गुट्टे, शिवाजी गुट्टे व गोवींद गुट्टे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, बापुराव आप्पा उधारे हे दैठणा घाट गावचे गेल्या अडीच वर्षांपासून विद्यमान सरपंच आहेत, मात्र ते मागास जातीतील मातंग समाजाचे असल्यामुळे त्यांना गावातील वरील गावगुंड हे ग्रामपंचायत मार्फत कुठलेही विकासकाम करू देत नाहीत. आणि स्वतःच्या मनमानी प्रमाणे ग्रामपंचायत चा कारभार हाकण्याचा प्रयत्न करतात, सरपंच नात्याने त्यांच्या कारभारास विरोध केल्यानंतर मांगट्यानो तुम्हाला कचऱ्यातून बाहेर काढून इथपर्यंत आणलय आणि तुम्हीच आमच्या विरुद्ध जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज फाटे करता का? असे म्हणत ३ जुन २०२५ रोजी रात्री भरस्त्यात सरपंच पत्नी लताबाई बापुराव उधारे यांना वरील तिघांनी रस्त्यात अडवून शिवीगाळ आणि संपूर्ण कुटुंबास जीवे मारण्याची धमकी दिली.

सरपंच पत्नी लताबाई बापूराव उधारे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामिण पोलिसांनी हनुमंत गुट्टे, शिवाजी गुट्टे व गोविंद गुट्टे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३५२ ३५१ (२) ३५१(३) ३(५) अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक एक्ट ३(१)(r), ३(१)(s),३(२)(va) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या घटनेनंतर मातंग समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# घरकुल धारकांनी कुणालाही रूपया देऊ नये

## घराचे लवकर काम करून दिवाळी नव्या घरात साजरी करावी– गटविकास अधिकारी बागलाने

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यात जवळपास नवीन घरांसाठी वीस हजार पेक्षा अधिक मागणी अर्ज बेघर धारकांनी केले आहेत. आता नविन मंजूर झालेल्या घरकुल धारकांनी कुणालाही एक रूपाया देऊ नये,जर कुणी मागणी केली तर त्याची तक्रार आमच्याकडे रितसर करावी आणि यंदाची दिवाळी नव्या घरात साजरी करावी, असे आवाहन आष्टी पंचायत समिती चे गटविकास अधिकारी जी.व्ही. बागलाने यांनी केले आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी यांच्या कक्षेत शुक्रवार (दि.१३)रोजी दुपारी ४.३० वा. पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, पक्के आणि प्रशस्त घर असावे हे प्रत्येकाचं स्वप्न असत. केंद्र व राज्य सरकारच्या संकल्पनेतून व आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी तालुक्यात जवळपास २० हजारांपेक्षा जास्त गरजूंनी अर्ज दाखल केले आहेत. आता ह्या घरांची स्वप्न येत्या दिवाळीत पुर्ण होऊन यंदाची दिवाळीच नव्या घरात घरकुल धारकांनी साजरी करावी. परंतु ही नव्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी कुणाला रूपाया देण्याची गरज नाही, असे आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी सांगितले.

# शिवसंग्रामचे तांबे अन् माने यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश

## आ. संदीप क्षीरसागर यांनी केले स्वागत

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्रामचे शेषेराव तांबे यांनी आणि अक्षय माने यांनी आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. हा प्रवेशाचा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बीड येथील कार्यालयात पार पडला. यावेळी आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम यांनी दोघांचे स्वागत केले आहे. यामुळे शहरात राष्ट्रवादीची ताकद वाढणार आहे.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून, प्रभाग व गट, गणाची रचना करण्याचे आदेश आले आहेत. यामुळे सर्वच पक्ष आता अंग झाडून या निवडणुकांच्या तयारीला लागले असून, कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. या निवडणुकीच्या तोंडावर शिवसंग्रामला धक्का बसला असून शिवसंग्रामचे नेते शेषराव तांबे व अक्षय माने यांनी समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (शरदचंद्र पवार) प्रवेश केला. राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार साहेबांच्या पुरोगामी विचार तळागाळात पोहोचविण्यासाठी आपण उत्तम काम कराल अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांचा प्रवेश करून घेतला.

या सर्व युवकांना सोबत घेऊन पक्ष संघटना व पुरोगामी विचारांची शक्ती अधिक वाढविण्यासाठी प्रयत्न करत राहणार असे मत व्यक्त करीत. या दोघांसह त्यांच्या सर्व समर्थकांचे स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावितरण च्या गलथान कारभाराने गोरक्षनाथ लोंढे चा घेतला बळी; महावितरणच्या अधिकाऱ्यावर कारवाई होणार का ?

## धारूरच्या विद्युत अभियंत्याच्या भोंगळ कारभारामुळे रुई ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रूई पिंपळा येथे राहत असलेल्या बिबीशन लोंढे यांच्या मुलगा. गोरक्षनाथ लोंढे हा इयत्ता आठवी मध्ये यावर्षी ऍडमिशन घेणार होता. हॉस्टेलवर आपल्या मुलाला नोकरी लागावी याकरिता, बिबीशन लोंढे यांनी त्याला शाळेत दाखल केलं होतं मात्र काही दिवसांच्या सुट्टीवर, त्यांचा मुलगा हा रुई आपल्या जन्मगावी आला होता.



त्या ठिकाणी झालेल्या वादळी वारा, मूळ व तेथील लाईटची तार, तुटल्यामुळे, तेथे करंट उतरला. त्या ठिकाणी गोरक्षनाथ हा, शेतातून घराकडे येत असताना त्याच तारेला चिटकावून जागी त्याचा आकस्मित मृत्यू झाला. याला सर्वस्वी जबाबदार, महावितरण आहे हे मात्र यावेळी पाहायला मिळालं.

रुई गावामध्ये डीपी पासून तार तुटलेली जवळपास पंधरा दिवस तरीही तार कोठे दुरुस्ती केली नाही असं ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत. गावात मोठमोठे खांब वाकलेले आहेत आणि विद्युततारा या संपूर्ण रस्त्यावर आलेले आहेत. मात्र याकडे कुठल्याही प्रकारे स्थानिक असणारे विद्युत सहाय्यक व विद्युत अभियंता यांचं लक्ष नाही आणि यांच्या या भोंगळ कारभारामुळे, रुई येथील शालेय विद्यार्थी गोरक्षनाथ बिभीषण लोंढे त्याचा दुर्दैवाचा मृत्यू झाला आणि रुई गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# ईश्वर लक्ष्मण धनवे याचा अटकपूर्व जमीन नामंजूर : ॲड तेजस वडमारे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोढा भागातील चर्चित लहू पावळे यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने केलेली मारहाण प्रकरनातील आरोपी ईश्वर धनवे याचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला.



या बाबत सविस्तर वृत्त असे कि दिनांक ०३/०३/२०२५ रोजी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास लहू रामा पावळे किरकोळ कारणा वरून आरोपी परमेश्वर धनवे, ईश्वर धनवे, राकेश धनवे, राजू धनवे, योगेश जावळे, बाळू धनवे, अजय जावळे व इतर लोकांनी संगणमत करून फिर्यादी लहू पवळे यांना घरातून फरफटत बाहेर काढून लाथाबुक्क्याने मारहाण करत राजू धनवे याने जीव घेण्याच्या उद्देशाने लहू पवळे यांच्या मानेवर तलवारीने वार केला असता तो फिर्यादी लहु यांनी चुकवला व परमेश्वर धनवे याने त्याची मोटारसायकल भरधाव वेगात जीव घेण्याच्या उद्देशाने फिर्यादी लहू पवळे याच्या अंगावर घातली त्यामुळे त्याच्या उजव्या पायाला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली व अधिक रक्तस्त्राव होऊन फिर्यादी लहु पवळे बेशुद्ध झाला. त्यानंतर फिर्यादी लहु पवळे यांच्या जवाबा वरून दिनांक १०/०३/२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणे बीड येथे वरील आरोपी विरुद्ध गु. र. नंबर ७३/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११५(२), ११८(२), ३३३, ३५१(२), ३५२, १८९(२), १९१(२) १९१ (३), १९०, व शस्त्र अधिनियम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.

आरोपी नामें ईश्वर धनवे याने अटकपूर्व जामीन मिळवण्याकारिता मा सत्र न्यायालय बीड येथे धाव घेत जामीन अर्ज क्रमांक ४९८/२०२५ दाखल केला होता, सदर प्रकारणात फिर्यादी यांनी ड तेजस वडमारे याच्या मार्फत जामीन अर्जावर आक्षेप घेतला. दोन्ही पक्षाचे युक्तिवाद ऐकून मा. सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी फिर्यादी च्या वतीने ॲड. तेजस वडमारे यांनी दाखल केलेले जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र, आरोपिंची गुन्हेगारी पार्श्वभूमी दर्शवणारे कागदपत्र व फिर्यादीची बाजू भक्कम पणे मांडून फिर्यादीच्या वतीने प्रभावशाली केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा अटकपूर्व जामीन नामंजूर केला. या प्रकरणावर पेठ बीड भागातील नागरिकांचे लक्ष लागलेले होते. या प्रकरणात ॲड. तेजस वडमारे यांना ॲड फारुख शेख, ॲड राहुल सोळंके यांनी सहकार्य केले.


# आष्टी तालुक्यामधील १६ हजार विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी मिळणार पाठ्यपुस्तके

## सात केंद्रांना पुस्तके पोहोचली

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या १६ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५ ते २६ साठी मोफत पाठ्यपुसतकचे विवरण शाळेच्या पहिल्या दिवशी करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी गटशिक्षणाधिकारी सीमा काळे यांनी दिली आहे. आष्टी तालुक्यातील ३८९ शाळांमधील मराठी सेमी इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व पाठ्यपुस्तके देण्यात येणार असून आतापर्यंत सात केंद्रना पुस्तके पोहोच झालेली आहेत.

अकरा जूनपर्यंत शंभर टक्के पाठ्यपुस्तके प्रत्यक्ष शाळेत पोहोचणार आहेत. सोमवारी गटशिक्षणाधिकारी काळे यांनी गाडीला हिरवा झेंडा दाखवून पाठ्यपुस्तक वितरणाचा शुभारंभ केला शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे हाती पाठ्यपुस्तके पोहच. होण्याकरता शिक्षण विभाग कटिबद्ध असून पुस्तकांपासून कोणीही वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्यात येणार असल्याचे गटशिक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले.



अनेक वर्षापासून वाहतुकीचा निधीच नाही

पाठ्यपुस्तक वितरणासाठी काही वर्षापासून निधी आलेला नाही यावर्षी पण आलेलं नाही तथापि केंद्रप्रमुख मुख्याध्यापकाचे योगदानातून पुस्तक वितरणाचे काम चालू आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तक मिळावी धारणा असून केंद्रप्रमुख व सर्वसाधारण व्यक्ती कार्यालयीन सर्व कर्मचारी बांधवांमुळे ही संपूर्ण शक्य होत असल्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

### शाळेतील गळतीचे प्रमाण शून्यावर आणावे

मुले पुस्तकाभावी शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित राखून शाळेतील गळतीचे प्रमाण शून्य आणावे हाय ह्या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या पहिली ते आठवीपर्यंत १६ हजार विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तक मिळणार आहेत.

**– सीमा काळे,** प्रभारी गटशिक्षणाधिकारी आष्टी

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT